034

CR1985082301

अंदाज समिती १९८४-८५

शिफारशींवर कार्यवाही.

महाराष्ट्र शासन,

वित्त विभाग,

परिपत्रक क्रमांक : बीजेटी-१०८४/प्र.क्र. १४९/सर्वसाधारण-४,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,

दिनांक : २३ ऑगस्ट १९८५.

वाचा :- (१) वित्त विभाग, परिपत्रक क्रमांक बीजीटी-१०७६/७४/बीयुडी-५, दिनांक ६ फेब्रुवारी १९७६.

(२) वित्त विभाग, परिपत्रक क्रमांक बीजीटी-२६८१/२१/बीयुडी-२, दिनांक ३ फेब्रुवारी १९८२.

परिपत्रक

======

सन १९८४-८५ च्या अर्थसंकल्पात ज्या नवीन योजनांचा अंतर्भाव करण्यात आला आहे अशा बाबींची छाननी करून अंदाज समितीने, आपल्या बत्तीसाव्या अहवालात (१९८४-८५) (सहावी महाराष्ट्र विधानसभा) त्यातील महत्वाच्या अशा बाबींच्या संदर्भात आपले अभिप्राय व शिफारशी व्यक्त केल्या आहेत.

२. खालील बाबींचे बाबतीत समितीने अधिक माहिती मागविली असता व विभागीय सचिवांबरोबर चर्चा केली असता, समितीच्या असे निदर्शनास आले की, या नवीन बाबींच्या संबंधात पूर्ण विचार व योग्य ती पूर्व तयारी झाली नव्हती.

(१) कृषिविषयक योजनांचे स्वतंत्र अभिकरणामार्फत संनियंत्रण व मूल्यमापन करणे. (योजनांतर्गत बाब क्रमांक १३)

(२) शासकीय तांत्रिक माध्यमिक शाळा/केंद्र यामध्ये माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षेच्या पातळीवर तांत्रिक शिक्षणाचा सुधारित अभ्यासक्रम पथदर्शी तत्वावर सुरु करणे. (योजनांतर्गत बाब क्रमांक ७७)

(३) नांदेड येथील गुरु गोविंद सिंहजी अभियांत्रिकी महाविद्यालयाला सहाय्यक अनुदान. (योजनांतर्गत बाब क्रमांक ९०)

(४) क्रिडा व युवक सेवा संचालनालयातील कर्मचाऱ्यांची संख्या वाढविणे. (योजनांतर्गत बाब क्रमांक १५५)

(५) खोळावर क्रिकेट तयार करणे (योजनांतर्गत बाब क्रमांक १६३)

(६) क्रिडापटूंसाठी वसतीगृहे बांधण्याकरिता स्वेच्छा संघटनांना महानगरपालिकांना/नगर पालिकांना वित्तीय सहाय्य देणे (योजनांतर्गत बाब क्रमांक १७३)

...२/-

(७) कुस्ती, ज्युडो व कराटे या कलांचा विकास (योजनांतर्गत बाब क्रमांक १७८)

(८) राज्य पातळीवर माहिती युनिट व मासिक सुरु करणे (योजनांतर्गत बाब क्रमांक १९३)

(९) महाराष्ट्र आणि कोकण विभागातील दोन मास मिनीएचर रेडिओग्राफी पथकाची स्थापना करणे.
( योजनांतर्गत बाब क्रमांक २०७)

)१०) ज. जी. गट रुग्णालय, मुंबई हृदयचिकित्सा विभागाचा दर्जा वाढविणे.
(योजनांतर्गत बाब क्रमांक २३२)

3. यासाठी समितीने बत्तीसाव्या अहवालातील परिच्छेद चार "सर्वसाधारण, यामध्ये प्रशासकीय विभागांना अशा सूचना केली आहे की, "नवीन बाब अंदाजपत्रकात प्रस्तावित करण्यापूर्वी त्या संबंधात अशा त-हेने पूर्वतयारी पूर्ण झाली पाहिले की, विधानमंडळाची मान्यता मिळताच कामाला सुरुवात होईल व लवकरात लवकर नवीन बाबींची पूर्तता होऊन तिचे फायदे मिळू शकतील.

४. समिती वरील संदर्भात पुढे अशीही शिफारस करत आहे की, " संबंधित विभागांनी व विशेषतः "वित्त" विभागाने याबाबत विशेष छाननी करुन ज्या बाबीबद्दल पुरेशी पूर्वतयारी झाली नाही वा त्या बाबीसंदर्भात पूर्ण माहिती विभागाकडे उपलब्ध नाही अशा बाबी "नवीन बाबी" म्हणून स्विकारल्या जाणार नाहीत अशी दक्षता घेतली पाहिले असे मत समिती व्यक्त करते. कांही वर्षांपूर्वी & "वित्त विभाग" या बाबतीत सतर्क असल्यामुळे अशा अडचणी उपस्थित होत नव्हत्या. या संबंधात विशेष काळजी घेऊन ज्या बाबींची पुरेशी
( जसे नवीन बाबींचा पूर्ण विचार, जरूर असणाऱ्या कोणत्या सामुग्रीचा, इमारतीचा, वा इतर खरेदी करावयाच्या सामुग्रीचा तांत्रिक तपशील, खरेदीची पध्दत, पुरवठा करु शकतील अशा कारखानदारांची नावे, ... परदेशातून करावयाची आयात, या बाबतीत सल्ला देऊ शकतील अशा व्यक्ती व संस्थांची नावे इत्यादि ) झालेली नाही अशा नवीन बाबी अर्थसंकल्पात प्रस्तावित होऊ नयेत अशी समितीची शिफारस आहे."

५. अंदाज समितीच्या वरील शिफारशींच्या अनुरोधाने प्रशासकीय विभागांना व त्यांचे नियंत्रणाखालील विभाग प्रमुखांना अशा सूचना देण्यात येत आहेत की, त्यांनी नवीन बाब अंदाजपत्रकात प्रस्तावित करण्यापूर्वी त्यासंबंधात पूर्ण विचार करुन व योग्य ती पूर्वतयारी करुन, त्याबाबत विशेष छाननी करुन मगच ती अंदाजपत्रकासाठी प्रस्तावित केली जावी. पुढील काळासाठी नवीन बाबी तयार करताना आणि सादर करताना वरील सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याची त्यांना विनंती करण्यात येत आहे.

...3/-

६. समितीच्या वरील शिफारशीनुसार वित्त विभागातील सर्व ''व्यय'' कार्यासनांनाही सतर्क राहून ज्या बाबीसंदर्भात पूर्ण माहिती प्रशासकीय विभागांकडे उपलब्ध नसेल अशा बाबी नवीन बाबी म्हणून अर्थसंकल्पात समाविष्ट केल्या जाणार नाहीत याबद्दल योग्य दक्षता घेण्यात यावी अशी विनंती करण्यात येत आहे.

७. याबाबत वित्त विभागाने प्रस्ताविक मध्ये निर्देशीलेले व तसेच वेळोवेळी काढलेले आदेश लक्षात घेऊन नवीन बाबींवरील शिफारशीबाबत प्रशासकीय विभागांनी नेहमी सतर्क राहून भविष्य काळात समितीने उल्लेखीलेले दोष टाळण्याची काळजी घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-
(मो. तु. गांगुर्डे.)
शासनाचे उप सचिव,
वित्त विभाग.

प्रति,

सर्व मंत्रालयीन विभाग.

= = = = = = ===== = = = = === = = = = ====== = = = = = = = = =

क्रमांक लेखा/एसी ४५/८/सीआर११३५/अ.३/८५
पुणे, दिनांक : १३ ३९/१९८५

प्रतिलिपी /- उपसंचालक भूमि अभिलेख सर्व / विशेष अधिक्षक भूमि अभिलेख / अधिक्षक भूमि अभिलेख सर्व/ एकत्रीकरण अधिकारी सर्व यांना माहिती व ---- मार्गदर्शनासाठी अग्रेषित.

जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
भूमि अभिलेख, म.रा.पुणे यांचेकरिता.

प्रत /- कार्यासन अधिकारी सर्व जमाबंदी आयुक्त पुणे/ अभिलेखागार.

६. समितीच्या वरील शिफारशीनुसार वित्त विभागातील सर्व ''व्यय'' कार्यासनांनाही सतर्क राहून ज्या बाबींसंदर्भात पूर्ण माहिती प्रशासकीय विभागांकडे उपलब्ध नसेल अशा बाबी नवीन बाबी म्हणून अर्थसंकल्पात समाविष्ट केल्या जाणार नाहीत याबद्दल योग्य दक्षता घेण्यात यावी अशी विनंती करण्यात येत आहे.

७. याबाबत वित्त विभागाने पुस्तिके मध्ये निर्देशीलेले व तसेच वेळोवेळी काढलेले आदेश लक्षात घेऊन नवीन बाबींवरील शिफारशीबाबत प्रशासकीय विभागांनी नेहमी सतर्क राहून भविष्य काळात समितीने उल्लेखीलेले दोष टाळण्याची काळजी घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-
( मो. तु. गांगुर्डे. )
शासनाचे उप सचिव,
वित्त विभाग.

प्रति,

सर्व मंत्रालयीन विभाग.

= = = = = = ====== = = = = === = = = = ====== = = = = = = = = =

क्रमांक लेखा/एसी ४५८/सीआर११३५/अ.३/८५
पुणे, दिनांक : १३ ३९/१९८५

प्रतिलिपी /- उपसंचालक भूमि अभिलेख सर्व / विशेष अधिक्षक भूमि अभिलेख / अधिक्षक भूमि अभिलेख सर्व/ एकत्रीकरण अधिकारी सर्व यांना माहिती व मार्गदर्शनासाठी अग्रेषित.

[signature] ९८१८
जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
भूमि अभिलेख, म.रा.पुणे यांचेकरिता.

प्रत /- कार्यासन अधिकारी सर्व जमाबंदी आयुक्त पुणे/ अभिलेखागार.